ePaper

## होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजावर भीषण हल्ला; 11 भारतीय खलाशी जखमी



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 07 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 3 वरुन...

१२ हजार मतांचा प्रभाव निर्णयक ठरण्याची शक्यता







### संसद ते निवडणूक आयोग मोर्चा; पोलिसांनी रोखले, राहुल-प्रियंका ताब्यात व सुटका

# ECI विरोधात INDIA आघाडीचा एल्गार!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मतदार यादीतील कथित अनियमितता, 'SIR' प्रक्रिया आणि 'व्होट चोरी'च्या आरोपांवरून दिल्लीतील राजकीय वातावरण आज चांगलेच तापले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह INDIA आघाडीच्या ३०० हून अधिक खासदारांनी संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे मोर्चा काढला.**

## राहुल-प्रियंका पोलिसांच्या ताब्यात

मोर्चा पुढे जाऊ न दिल्याने राहुल गांधी, प्रियंका गांधी, अखिलेश यादव, अभिषेक बॅनर्जी, डेरेक ओब्रायन यांच्यासह अनेक नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र, पोलिसांच्या बसमधून बाहेर पडल्यानंतर राहुल आणि प्रियंका गांधी आकाशवाणी भवन परिसरात दाखल झाले आणि तेथेच ठिय्या आंदोलन सुरू केले. काँग्रेसचे अन्य नेतेही त्यांच्यासोबत सहभागी झाले.

## भाजपचा पलटवार

दरम्यान, भाजपने राहुल गांधींच्या आंदोलनावर टीका केली. भाजप प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी काँग्रेसवर SIR प्रक्रियेबाबत दिशाभूल करणारे आरोप केल्याचा आरोप केला. तसेच घटनात्मक संस्थांवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे भाजपने म्हटले. मतदार यादी, SIR प्रक्रिया आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरून सत्ताधारी भाजप आणि विरोधकांमधील संघर्षामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.



## राहुल गांधींचा निवडणूक आयोगाला सवाल

आकाशवाणी भवन परिसरातून राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर निशाणा साधला. "आम्ही कोट्यवधी भारतीयांचे प्रतिनिधित्व करतो. आम्हाला निवडणूक आयुक्तांना भेटायचे आहे. मग ते आम्हाला भेटत का नाहीत?" असा सवाल त्यांनी केला.



## विरोधकांच्या प्रमुख मागण्या

INDIA आघाडीने SIR प्रक्रियेत वगळण्यात आलेली मतदारांची नावे पुन्हा समाविष्ट करावीत, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखावी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. तसेच EVMऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणीही करण्यात आली.

## पोलिसांनी मोर्चा रोखला

सकाळी INDIA आघाडीचे खासदार संसद परिसरात एकत्र आले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत 'SAVE DEMOCRACY' आणि 'SAVE MY VOTE'च्या घोषणा देत मोर्चाला सुरुवात झाली. परिवहन भवनाजवळ दिल्ली पोलिसांनी बॅरिकेडिंग करून मोर्चा रोखला. त्यानंतर राहुल गांधींसह विरोधी खासदारांनी रस्त्यावरच ठिय्या आंदोलन केले. यावेळी राहुल गांधी बॅरिकेडवर चढले आणि हातात तिरंगा घेत आंदोलकांना संबोधित केले.

# पुण्यात घराणेशाहीचा पाया अधिक भक्कम

## पुणे जिल्ह्याच्या राजकारणात घराणेशाहीला बळकटी; पीडीसीसी निवडणूक ठरली कारणीभूत

महाईन्यूज । पुणे

**पुणे जिल्ह्याच्या राजकारणात घराणेशाहीला बळकटी आणण्यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची (पीडीसीसी) निवडणूक कारणीभूत ठरली आहे. या बँकेच्या संचालक पदासाठी पुणे जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांनी आपापल्या कुटुंबातील वारसदारांच्या राजकीय पटलावर नोंदी करून ठेवल्या आहेत. संचालक पदासाठी सहकारी संस्थांमधून नेमण्यात येणाऱ्या मतदार प्रतिनिधींसाठी कुटुंबातील व्यक्तींची नावे सुचविल्याने जिल्ह्यात घराणेशाहीचा पाया आणखी घट्ट झाल्याची चर्चा राजकीत वर्तुळात सुरू झाली आहे.**



पुणे जिल्ह्याचे राजकारण आणि अर्थकारणाच्या केंद्रस्थानी कायम 'पीडीसीसी' बँक असते. त्यामुळे या बँकेचे संचालकपद हे जिल्ह्याच्या राजकारणात सन्मानाचे मानले जाते. या बँकेवर आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राजकीय समीकरणे बदलली आहेत. या बँकेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ येत्या डिसेंबर महिन्यात संपणार असल्याने नवीन संचालक मंडळासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. संचालक मंडळ निवडणुकीसाठी सहकारी संस्थांना मतदान प्रतिनिधी पाठवायचा असतो. त्यासाठी २२ सप्टेंबर मुदत होती. त्यानुसार सहकारी संस्थांनी आपापल्या क्षेत्रातील प्रतिनिधीं ची निवड करून त्याबाबतचे ठराव पाठविले आहेत. तीन जानेवारी २०२७ रोजी निवडणूक होणार आहे. त्यासाठी जिल्ह्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचे लातूर जिल्हा सहकारी बँकेचे संचालकपद भारतीय रिझर्व्ह बँकेने नियमभंगाची कारवाई करत रद्द केल्यामुळे 'पीडीसीसी' बँकेवर संचालक असलेल्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये अस्वस्थता आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नवीन नियावलीनुसार बँकेच्या संचालक मंडळावर कोणतीही व्यक्ती सलग दहा वर्षांपेक्षा जास्त काळ संचालक म्हणून राहू शकणार नाही. तसेच सलग दहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर संचालकाला किमान तीन वर्षांचा 'कूलिंग ऑफ' कालावधी म्हणजेच विश्रांतीचा काळ पूर्ण करणे बंधनकारक केले आहे. राज्याच्या सहकार कायद्यात याबाबत तरतूद नसल्याचा दावा करण्यात येत होता. मात्र, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचेच पद रद्द करण्यात आल्यामुळे पुणे जिल्ह्यातील नऊ ज्येष्ठ नेत्यांना फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. 'पीडीसीसी' बँकेच्या संचालक पदावर दहा वर्षांपेक्षा जास्त काळ काम केलेल्यांमध्ये कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी आमदार संग्राम थोपटे आणि बँकेचे माजी अध्यक्ष, माजी आमदार रमेश थोरात यांच्यासह बँकेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, आप्पासाहेब जगदाळे, संजय काळे, रेवणनाथ दारवटकर यांचा समावेश आहे.

### ज्येष्ठ नेत्यांचे वारसदार कोण?

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह चिरंजीव खासदार पार्थ पवार आणि जय पवार यांच्या नावांचा प्रस्ताव बारामतीतील सहकारी संस्थांच्या मतदार प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आला आहे. राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे चिरंजीव श्रीराज भरणे यांचा मतदान प्रतिनिधी म्हणून ठराव पाठविला गेला आहे. श्रीराज भरणे हे इंदापूर तालुक्यातील बोरी पंचायत समितीत सदस्य आहेत. माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांचे पुतणे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील यांचा नावाचा प्रस्ताव आंबेगावातील लाखणगाव येथील सोसायटीतून पाठविण्यात आला आहे. बँकेचे विद्यमान अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे यांची कन्या प्राजक्ता दुर्गाडे यांच्या नावाचा प्रस्ताव आहे. त्या पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्य आहेत. दौंड तालुक्यातून आमदार राहुल कुल यांच्यासह पत्नी कांचन कुल यांच्या नावांचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

---

# पुण्यातील MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत शरद पवारांचा मुख्यमंत्री फडणवीसांना फोन

महाईन्यूज । पुणे

**पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबरपासून आंदोलन सुरू केलं आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील गोंधळ, पेपरफुटी, रखडलेल्या भरती प्रक्रिया आणि एमपीएससी आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा अशा विविध मुद्यांवरून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुण्यात आंदोलन सुरू केलं आहे.**





या आंदोलनाला आज तीन दिवस झाले आहेत. मात्र, अद्यापही राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

एमपीएससीच्या या विद्यार्थ्यांचं हे 'सत्याग्रह आंदोलन' राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात सुरू आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या काही प्रतिनिधींनी आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी शरद पवारांनी विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली.

यावेळी विद्यार्थ्यांच्या मागण्यासंदर्भात शरद पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संपर्क साधला आणि विद्यार्थ्यांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांना सांगितल्या. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याचं आवाहन शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केलं आहे. 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधावा आणि त्यांच्या मागण्यांचा विचार करावा. विद्यार्थ्यांना न्याय देण्याची सरकारची नैतिक जबाबदारी आहे', अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

"विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन मार्ग काढला जावा, यासाठी मी स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. मात्र, देवेंद्र फडणवीस हे आज मुंबईत नाहीत, ते नागपूरला आहेत. ते बहुतेक उद्या सकाळी मुंबईला येतील. मुख्यमंत्री फडणवीसांना मी विनंती केली की, तुम्ही मुंबईत आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष घाला. विद्यार्थ्यांशी संवाद साधा. जर आवश्यकता असेल तर तुम्ही आणि विद्यार्थ्यांचे काही प्रतिनिधी चर्चा करा. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी जे शक्य आहे ते सर्व करण्याचं आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुचवलं. आता ते उद्या मुंबईत आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत भूमिका मांडतील.

### शरद पवार काय म्हणाले?

"माझ्याकडे विद्यार्थ्यांचे काही प्रतिनिधी आले होते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत आणि त्यांच्या मागण्याबाबत मार्ग निघायला हवा. सुसंवाद असायला हवा. एका बाजूने राज्याचे मुख्यमंत्री किंवा त्यांचे सहकारी आणि दुसऱ्या बाजूने विद्यार्थ्यांचे काही प्रतिनिधी यांच्यात चर्चा व्हावी. मात्र, जर चर्चा झाली नाही तर प्रश्न सुटणार नाहीत. कोणताही प्रश्न सुटायचा असेल तर सुसंवाद असायला हवा", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# चाकणपाठोपाठ थेऊरमध्येही कचऱ्यावर ‘पीएमआरडीए’चा प्रहार!

## १४ गावांसाठी १५० टीपीडी क्षमतेचा प्रकल्प; १० एकर जागेवर उभारणीचे नियोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चाकणपाठोपाठ आता पूर्व हवेलीतील कचराकोंडी फोडण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पुढाकार घेतला आहे. थेऊर आणि परिसरातील १४ ग्रामपंचायतींसाठी थेऊर येथील १० एकर गायरान जागेवर १५० टन प्रतिदिन (टीपीडी) क्षमतेचा मध्यवर्ती घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. सन २०४३ पर्यंतची संभाव्य लोकसंख्यावाढ विचारात घेऊन या प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे.**



### चाकणपाठोपाठ पूर्व हवेलीलाही दिलासा

चाकण एमआयडीसी परिसरातील १९ ग्रामपंचायती आणि दोन नगरपरिषदांसाठी पीएमआरडीएकडून मध्यवर्ती घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाची प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर आता थेऊर परिसरासाठी दुसरा मोठा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यामुळे पीएमआरडीएच्या औद्योगिक आणि निमशहरी भागातील पुढील ३० वर्षांच्या कचरा व्यवस्थापनासाठी ठोस आराखडा तयार होण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पाच्या नियोजनाबाबत पीएमआरडीएच्या आकुर्डी येथील मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सोमवारी (दि. ६) विशेष आढावा बैठक झाली. शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या उपस्थितीत आणि महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी, मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) रिनाज पठाण, कार्यकारी अभियंता अनिता कुलकर्णी यांच्यासह संबंधित अधिकारी तसेच १४ गावांचे सरपंच, प्रशासक व विस्तार अधिकारी उपस्थित होते.

थेऊर येथील उपलब्ध गायरान क्षेत्रापैकी १० एकर जागा प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्पष्ट केले. सहभागी ग्रामपंचायतींनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलित करून प्रकल्पस्थळापासून २० किलोमीटरच्या परिसरातील कचरा या केंद्रावर आणणे अपेक्षित आहे. कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींना निश्चित केलेली ‘टिपिंग फी’ भरावी लागणार आहे. या प्रकल्पात सहभागी होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींकडून ठरावही मागविण्यात आले आहेत.

या प्रकल्पात थेऊर, लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, केसनंद, वाडेबोल्हाई, उरुळी कांचन, साष्टे, कोरेगाव मूळ, सोरतापवाडी, आळंदी म्हातोबाची, नायगाव प्रयागधाम, शिंदवणे, पेठ आणि कोळवडी या १४ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. त्यामुळे पूर्व हवेलीतील या गावांचा कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दीर्घकालीन पद्धतीने मार्गी लागण्याची अपेक्षा आहे.

आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी पीएमआरडीएने हा प्रकल्प हाती घेतल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन केले. आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या ग्रामपंचायतींना कचरा वाहतुकीसाठी जिल्हा परिषद आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून घंटागाड्या उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, परिसरातील इतर ग्रामपंचायतींनीही या प्रकल्पात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

# पिंपरी-चिंचवडमधील १२ हजार मतांचा प्रभाव निर्णायक ठरण्याची शक्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक विनायक रणसुभे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात त्यांनी अर्ज सादर केला. यावेळी संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. रणसुभे यांच्या उमेदवारीमुळे पदवीधर मतदारसंघातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**




### १२ हजार मते ठरणार निर्णायक?

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत पिंपरी-चिंचवडमधील मतदारसंख्या महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे. विनायक रणसुभे यांचा या परिसरातील दीर्घ राजकीय प्रवास आणि जनसंपर्क पाहता सुमारे १२ हजार मतांचा प्रभाव त्यांच्या उमेदवारीसाठी निर्णायक ठरतो का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### १६व्या वर्षापासून राजकारणात सक्रिय

विनायक रणसुभे यांनी वयाच्या १६व्या वर्षी राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. २००६ मध्ये शिक्षण मंडळाची निवडणूक जिंकत त्यांनी राजकीय वाटचालीत ठसा उमटवला.

त्यानंतर २००७ ते २०१२ या काळात नगरसेवक म्हणून काम करताना कामगार, शेतकरी आणि विद्यार्थी चळवळींमध्येही सक्रिय सहभाग घेतला.

विनायक रणसुभे वयाच्या १६व्या वर्षापासून राजकारणात सक्रिय असून, दिवंगत नेते प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या प्रेरणेतून त्यांनी राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. सन २००६ मध्ये काँग्रेसच्या वतीने पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षण मंडळाची निवडणूक लढवित त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला होता. यानंतर २००७ ते २०१२ या कालावधीत त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेत नगरसेवक म्हणून काम केले. राजकीय क्षेत्रासोबतच कामगार, शेतकरी आणि विद्यार्थी चळवळींमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. कोल्हापूर ही जन्मभूमी, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही कर्मभूमी असल्याने या परिसरात त्यांचा मोठा जनसंपर्क असल्याचे मानले जाते.

विशेषतः पिंपरी-चिंचवड परिसरातील मतदारांमध्ये रणसुभे यांचा प्रभाव असल्याचा दावा केला जात असून, सुमारे १२ हजार मतांचा हा मतदारवर्ग त्यांच्या उमेदवारीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत पिंपरी-चिंचवडमधील मतदानाचे गणित निर्णायक ठरण्याची शक्यता असल्याने रणसुभे यांच्या उमेदवारीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच रणसुभे यांनी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीतील स्पर्धा अधिक रंगण्याची शक्यता आहे. त्यांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव, पिंपरी-चिंचवडमधील जनसंपर्क आणि विविध सामाजिक चळवळींमधील सहभाग यामुळे त्यांची उमेदवारी कितपत प्रभावी ठरते, हे निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट होणार आहे.

# दुष्काळाचे चक्र तोडण्यासाठी घोषणांपलीकडे जावे!



## भूमिका

**दुष्काळाचे संकट आले की सरकारी यंत्रणा शेताच्या बांधावर पोहोचते. पंचनामे होतात, मदतीच्या घोषणा होतात, कर्जवसुलीला स्थगिती दिली जाते आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन सुरू होते. संकटाच्या काळात ही मदत आवश्यकच आहे. मात्र दरवर्षी त्याच उपाययोजनांची पुनरावृत्ती करावी लागत असेल,**




तर प्रश्न केवळ निसर्गाच्या लहरीपणाचा राहत नाही; तो आपल्या नियोजनातील त्रुटींचाही ठरतो. दुष्काळानंतर मदत करण्यापेक्षा दुष्काळाचा परिणाम कमी करणारी कायमस्वरूपी व्यवस्था उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे. मराठवाड्यासारख्या तुलनेने कमी पर्जन्यमानाच्या प्रदेशासाठी स्वतंत्र आणि दीर्घकालीन जलधोरणाची गरज आहे.

कमी कालावधीत मुसळधार पाऊस आणि त्यानंतर दीर्घकाळ पावसाचा खंड, अशी बदललेली पर्जन्यरचना कोरडवाहू शेतीसमोर गंभीर आव्हान उभे करत आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या कामांची संख्या वाढविण्यापेक्षा त्यांचा प्रत्यक्ष परिणाम तपासला पाहिजे. नाला बांध, शेततळी, पाझर तलाव आणि बंधाऱ्यांमधून किती पाणी साठले, किती जमिनीत मुरले आणि भूजलपातळीत किती वाढ झाली, याचा हिशेब ठेवला पाहिजे. प्रत्येक गावाचा जलताळेबंद तयार करून उपलब्ध पाणी आणि गरज यांचा शास्त्रीय मेळ घालणे आवश्यक आहे. भूजलाचा अमर्याद उपसा थांबवून उपलब्ध पाण्यानुसार पीकपद्धती ठरवावी. ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा, मूग, उडीद, तीळ आणि करडई यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे योग्य ठरेल. मात्र पीकबदलाचा सल्ला देऊन जबाबदारी संपत नाही. त्या उत्पादनाला बाजारपेठ, योग्य दर, साठवणूक, प्रक्रिया उद्योग आणि मूल्यवर्धनाची जोड मिळाली पाहिजे. अन्यथा शेतकरी पुन्हा अधिक जोखमीच्या पिकांकडे वळेल.

दुष्काळ हा केवळ शेतीचा प्रश्न नाही. रोजगाराच्या संधी कमी होणे, स्थलांतर वाढणे, ग्रामीण बाजारपेठेतील पैशाचा प्रवाह घटणे आणि स्थानिक उद्योगांवर परिणाम होणे, असे त्याचे व्यापक परिणाम आहेत. त्यामुळे जलव्यवस्थापनाबरोबरच कृषी प्रक्रिया उद्योग, ग्रामीण रोजगार आणि शेतीपूरक व्यवसायांना चालना देणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्यात अधिक उत्पादन आणि उत्पादनातून अधिक उत्पन्न, हा विकासाचा आधार असला पाहिजे. नदीजोड, वॉटर ग्रीड किंवा अन्य भागांतील पाणी मराठवाड्याकडे वळविण्याच्या योजना याबाबत वेळोवेळी घोषणा होतात. मात्र घोषणा, निधी, कालमर्यादा आणि प्रत्यक्ष लाभ यातील अंतर कमी झाले पाहिजे. किती निधी मंजूर झाला, किती खर्च झाला, किती कामे पूर्ण झाली आणि त्यातून किती पाणी उपलब्ध झाले, याचा सार्वजनिक हिशेब जनतेसमोर मांडला पाहिजे.

दुष्काळाचे चक्र तोडायचे असेल, तर मदतीच्या घोषणांपेक्षा दीर्घकालीन नियोजन, प्रशासनिक सातत्य आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे. सरकारने संकटात मदत करावीच; पण पुढील संकटाची तीव्रता कमी करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. दुष्काळाला इष्टापत्तीमध्ये बदलायचे असेल, तर बांधावरच्या घोषणांपेक्षा शाश्वत जलसुरक्षा आणि विकासाची व्यवस्था उभी करणे हीच खरी कसोटी आहे.

## प्रासंगिक »

### दोन रोपांची गोष्ट

**एका शेतकऱ्याने आपल्या शेताच्या कडेला दोन रोपे लावली. पहिल्या रोपाला तो रोज पाणी घालत असे. दुसरे रोप थोडे दूर असल्याने त्याला पाणी कमी मिळत असे. पहिले रोप वेगाने वाढले.**

त्याची पाने हिरवीगार झाली. ते स्वतःच्या वाढीचा अभिमान बाळगू लागले. दुसरे रोप मात्र हळूहळू वाढत होते. त्याची मुळे जमिनीत खोलवर जात होती.

एके दिवशी गावात मोठे वादळ आले. जोरदार वाऱ्यामुळे पहिल्या रोपाची मुळे कमकुवत असल्याने ते जमिनीतून उखडले गेले. दुसरे रोप मात्र वाऱ्याच्या तडाख्यातही घट्ट उभे राहिले.

शेतकरी दुसऱ्या दिवशी शेतात आला. त्याने पडलेल्या रोपाकडे पाहिले आणि उभ्या रोपाच्या मुळांभोवतीची माती घट्ट केली.

तो म्हणाला, “वेगाने वाढणे महत्त्वाचे नाही; संकटात टिकून राहण्यासाठी मजबूत मुळे असणे महत्त्वाचे आहे.”

- तात्पर्य : परिस्थिती कितीही कठीण असली, तरी मजबूत पाया आणि संयम माणसाला टिकवून ठेवतात.

**शाळेतील पोषण आहार ही केवळ सरकारी योजना नाही, तर समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलांच्या आरोग्याची मोठी आधारव्यवस्था आहे. अनेक कुटुंबांत आई-वडील सकाळपासून संध्याकाळपर्यंत रोजंदारीच्या कामासाठी घराबाहेर असतात.**

## मुलांच्या ताटातील पोषणावरच राष्ट्राचे भविष्य!



अशा परिस्थितीत त्यांच्या मुलांना दिवसातून किमान एक वेळ सकस आणि पुरेसा आहार मिळावा, या उद्देशाने शालेय पोषण आहाराची कल्पना पुढे आली. त्यामुळे शाळेच्या ताटातील प्रत्येक घास हा मुलांच्या आरोग्याशी आणि भविष्यातील संधींशी जोडलेला आहे.

मुलांना खिचडी, दूध, अंडी, केळी किंवा अन्य पौष्टिक पदार्थ दिले जातात, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र या आहाराचा दर्जा आणि स्वच्छता याबाबत तक्रारी समोर येत असतील, तर त्या गंभीरपणे घेतल्या पाहिजेत. अन्नात अळी सापडणे, तांदळात खडे असणे, डाळीचे प्रमाण अत्यल्प असणे किंवा निकृष्ट दर्जाचा कच्चा माल वापरणे, या घटना केवळ प्रशासकीय त्रुटी म्हणून दुर्लक्षित करता येणार नाहीत. वाढत्या वयातील मुलांच्या आरोग्याशी अशा प्रकारे तडजोड करणे म्हणजे त्यांच्या भवितव्याशीच खेळणे होय. सरकारी योजनांमध्ये कागदोपत्री उद्दिष्टे, उष्मांक, प्रथिने आणि पोषकतत्त्वांचे निकष निश्चित केले जातात. परंतु या निकषांची अंमलबजावणी प्रत्यक्ष ताटात किती होते, याची नियमित तपासणी आवश्यक आहे. शाळेच्या स्वयंपाकघरातील स्वच्छता, अन्नधान्याचा दर्जा, साठवणूक, स्वयंपाकाची पद्धत आणि विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अन्नाचे प्रमाण यावर स्वतंत्र देखरेख असली पाहिजे. केवळ कागदावरील अहवालांच्या आधारे योजना यशस्वी ठरवणे योग्य ठरणार नाही.

यासाठी पालक, शिक्षक, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती आणि स्थानिक प्रशासन यांची भूमिका महत्त्वाची आहे. अन्नाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी नियमित नमुने घेणे, पुरवठादारांची जबाबदारी निश्चित करणे आणि त्रुटी आढळल्यास तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. तक्रार करणाऱ्या पालकांना किंवा शिक्षकांना अडचणीत आणण्याऐवजी त्यांच्या निरीक्षणाला व्यवस्थेच्या सुधारणेचे साधन मानले पाहिजे. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पुस्तके, तंत्रज्ञान, डिजिटल सुविधा आणि चांगल्या इमारती आवश्यक आहेतच; पण उपाशी किंवा कुपोषित मुलाकडून प्रभावी शिक्षणाची अपेक्षा कशी करणार? मुलाचे आरोग्य चांगले असेल, तरच त्याची एकाग्रता, उपस्थिती आणि शिकण्याची क्षमता वाढेल. त्यामुळे पोषण आहार हा शिक्षणव्यवस्थेचाच अविभाज्य भाग मानला पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



आतां तरी पुढें हाचि उपदेश ।
नका करूं नाश आयुष्याचा ॥१॥

सकळांच्या पायां माझें दंडवत ।
आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय!

## पोलिसांसाठी 'मुख्यमंत्री शौर्य पदक', वडार समाजासह विद्यार्थ्यांना मोठा दिलासा आणि मानधनात वाढ

**महाईन्यूज । मुंबई**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील पोलीस दल, विद्यार्थी, वसतिगृह कर्मचारी, आदिवासी बांधव तसेच विविध सामाजिक घटकांसाठी सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांसाठी नवीन शौर्य पदकाची घोषणा करण्यापासून ते विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात वाढ करण्यापर्यंत अनेक महत्त्वाच्या निर्णयांचा समावेश आहे.**




पारंपरिक दगडफोडी व उत्खनन करणाऱ्या वडार समाजाला राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. गौण खनिज स्वामित्वधनासाठी (रॉयल्टी) वाढीव सवलत देण्यात आली असून, आता वार्षिक उत्खनन मर्यादा दोनशे ब्रास वरून थेट पाचशे ब्रास करण्यात येणार आहे. यासाठी 'महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८' मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि संशोधनाला चालना देण्यासाठी 'सी.एम. सृष्टी' ही नवी योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय उच्च व तंत्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्रनिकेतने, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (लोणेरे-रायगड) या प्रमुख संस्थांच्या माध्यमातून ही योजना राबवली जाईल.

पोलीस कोठडीत असताना जर अनैसर्गिक मृत्यू ओढवला, तर अशा प्रकरणात मृताच्या कायदेशीर वारसांना वेळेत आर्थिक साहाय्य मिळवून देण्यासाठी एक सर्वसमावेशक नुकसानभरपाई धोरण तयार करण्यात आले असून या धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या मानधनात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदार यांसारख्या कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, राज्यातील सुमारे २ हजार ३८८ अनुदानित वसतिगृहांच्या कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही अर्ज करून प्रत्यक्ष प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे. अकरावी, बारावी तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भोजन, निवास आणि शैक्षणिक सुविधांसाठी मिळणाऱ्या भत्त्यांमध्ये (स्वाधार योजनेअंतर्गत) वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजने' अंतर्गत मिळणाऱ्या विविध भत्त्यांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

### मुख्यमंत्री शौर्य पदक

**कर्तव्य बजावताना मोठी जोखीम पत्करून आणि साहसी कामगिरी करणाऱ्या पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री शौर्य पदक देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या पदका अंतर्गत ५० हजार रुपयांची रोख रक्कम, पदक आणि प्रशस्तीपत्र दिले जाईल. यादरम्यान वर्षभरातील कामगिरीची दखल घेतली जाणार असून, यावर्षी १ जानेवारी २०२६ पासूनची कामगिरी यासाठी गृहीत धरली जाईल. दरवर्षी महाराष्ट्र दिनाच्या म्हणजेच १ मेच्या पूर्वसंध्येला या शौर्य पदकांची घोषणा केली जाईल आणि मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते ही पदके प्रदान केली जातील.**

## दहा जणांचे केंद्राचे पथक करणार दुष्काळाची पाहणी; शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणार

**महाईन्यूज । मुंबई**

**गतवर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी संकलित केलेली माहिती सरकारकडे उपलब्ध आहे. शेतकरी ओळख क्रमांक (ॲग्रीस्टॅक) आणि आधार क्रमांक जोडणी केलेल्या बँक खात्यांची अद्ययावत माहिती सरकारकडे उपलब्ध आहे.**



लोकप्रतिनिधींकडून आपल्या मतदारसंघातील तालुके दुष्काळी करण्याची मागणी होत आहे. अशी मागणी आलेल्या तालुक्यांची प्रत्यक्ष पहाणी करून, संबंधित अहवाल दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीकडे पाठविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. संबंधित अहवालावर उपसमितीत चर्चा करून दुष्काळग्रस्त तालुके जाहीर करणार आहोत. एकही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, अशीच सरकारची भूमिका आहे. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांच्या संख्येत वाढ होऊ शकते, असेही मकरंद जाधव म्हणाले.

दरम्यान, केंद्र सरकारचे दहा सदस्यीय पथक पुढील चार ते पाच दिवसांत महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करणार आहे. या पथकाचे तीन गट करण्यात येणार असून, एक गट छत्रपती संभाजीनगर, बीड आणि धाराशिव; दुसरा अकोला, वाशिम आणि यवतमाळ; तर तिसरा अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांचा दौरा करणार आहे. पाहणीनंतर केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

### दहा जणांचे केंद्र सरकारचे पथक करणार दुष्काळी पाहणी

कृषी विभागाच्या सचिवांच्या वतीने राज्यातील दुष्काळी जिल्हे, तालुक्यांची माहिती केंद्र सरकारला पाठविण्यात आली आहे. दहा जणांचे पथक पुढील चार – पाच दिवसांत राज्याच्या दौऱ्यावर येईल. या पथकांची तीन गटांत विभागणी होईल. पहिले पथक छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव जिल्ह्यांत पाहणी करेल. दुसरे पथक अकोला, वाशिम, यवतमाळमध्ये आणि तिसरे पथक अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यात पाहणी करेल. पथकाचा दौरा झाल्यानंतर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान दुष्काळी भागाच्या दौऱ्यावर येतील, अशी माहिती भरणे यांनी दिली.

# आशुतोष दीक्षित भारतीय हवाई दलाचे नवे प्रमुख

## कारगिल युद्ध, ऑपरेशन सिंदूरमध्ये होता सहभाग; ३१ ऑक्टोबर रोजी पद स्वीकारतील

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारतीय हवाई दलाच्या प्रमुखपदी एअर मार्शल आशुतोष दीक्षित यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या ते हवाई दल उपप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. विद्यमान हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह हे ३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त होत असून त्यानंतर दीक्षित हे या सर्वोच्च पदाची सूत्रे हाती घेतील.**



संरक्षण क्षेत्रातील 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमाला गती देण्यासाठी आणि स्वदेशी बनावटीचे लढाऊ विमान 'एलसीए तेजस'सह इतर देशांतर्गत विमान प्रकल्पांना बळ देण्यामध्ये एअर मार्शल दीक्षित यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यांच्या नियुक्तीमुळे देशाच्या हवाई संरक्षण सज्जतेत स्वदेशी तंत्रज्ञानाला आणखी चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे, असे वृत्त न्यूज १८ ने दिले आहे.

तब्बल चार दशकांच्या सेवाकाळात त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण लष्करी कारवाया आणि सरावांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे. कारगिल युद्धादरम्यान राबवण्यात आलेले 'ऑपरेशन सफेद सागर', तसेच 'ऑपरेशन रक्षक' आणि 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमांमध्ये त्यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. ११ जून २०१९ रोजी त्यांना एअर व्हाइस मार्शल, १ ऑक्टोबर २०२२ रोजी एअर मार्शल आणि १ सप्टेंबर २०२४ रोजी कमांडर-इन-चीफ पदावर बढती मिळाली.

दीक्षित यांच्या जवळपास चार दशकांच्या सेवाकाळात अनेक महत्त्वाच्या लष्करी मोहिमा आणि सरावांचा समावेश आहे. १९९९ मधील कारगिल युद्धादरम्यान भारतीय हवाई दलाने राबवलेल्या 'ऑपरेशन सफेद सागर'मध्ये त्यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर 'ऑपरेशन रक्षक' आणि अलीकडील 'ऑपरेशन सिंदूर'मध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कोप इंडिया यांसारख्या महत्त्वाच्या हवाई सरावांमध्येही त्यांचा सहभाग राहिला आहे.

त्यांच्या कारकीर्दीत पश्चिम क्षेत्रातील आघाडीच्या लढाऊ तळाची तसेच दक्षिण क्षेत्रातील महत्त्वाच्या फायटर ट्रेनिंग बेसची कमानही त्यांनी सांभाळली. त्यामुळे प्रत्यक्ष युद्धसज्जता, वैमानिक प्रशिक्षण आणि ऑपरेशनल नियोजन या तिन्ही क्षेत्रांचा त्यांना व्यापक अनुभव मिळाला आहे. केंद्र सरकारच्या नियुक्तीनुसार एअर मार्शल आशुतोष दीक्षित हे ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारपासून एअर चीफ मार्शल पदाचा कार्यभार स्वीकारतील. विद्यमान प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांच्या निवृत्तीनंतर ते भारतीय हवाई दलाचे नेतृत्व करतील. उपलब्ध माहितीनुसार त्यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत असेल.

### कोण आहेत एअर मार्शल आशुतोष दीक्षित?

आशुतोष दीक्षित यांचा जन्म ९ डिसेंबर १९६६ रोजी झाला. ६ डिसेंबर १९८६ रोजी भारतीय हवाई दलाच्या लढाऊ शाखेत दीक्षित यांची नियुक्ती झाली होती. ते राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, बांगलादेशातील डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज आणि नॅशनल डिफेन्स कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. प्रायोगिक चाचणी वैमानिक आणि पात्र उड्डाण प्रशिक्षक असलेले दीक्षित यांच्याकडे विविध प्रकारची लढाऊ विमाने चालवण्याचा ३,५०० तासांहून अधिक उड्डाणाचा दांडगा अनुभव आहे. यात मिराज-२०००, मिगच्या विविध आवृत्त्या, किरण, जग्वार, आयएल-७८, हॉक आणि तेजस या विमानांचा समावेश आहे.

# होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजावर भीषण हल्ला; ११ भारतीय खलाशी जखमी

**महाईन्यूज** । इराण

**ओमानच्या किनारपट्टीवर एमटी ऑन पीस या पनामाचा ध्वज असलेल्या व्यापारी जहाजावर मंगळवारी क्षेपणास्त्र हल्ला झाला. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून जात असताना झालेल्या या हल्ल्यात १२ क्रू मेंबर्स जखमी झाले असून, त्यामध्ये ११ भारतीय खलाशांचा समावेश आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे की, या भागात व्यापारी जहाजांवर होणारे सततचे हल्ले ही अत्यंत चिंतेची बाब असून, शांतता आणि स्थिरतेसाठी हे हल्ले त्वरित थांबवणं आवश्यक आहे. "या प्रदेशातील व्यापारी जहाजे, खलाशी आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणं थांबलं पाहिजे. आंतरराष्ट्रीय जलमार्गावरील दळणवळण आणि व्यापार लवकरात लवकर पूर्ववत झाला पाहिजे", असं मंत्रालयाने म्हटलं आहे.

'एमटी ऑन पीस'वरील हा हल्ला होर्मुझच्या सामुद्रधुनी आणि आसपासच्या परिसरात व्यापारी जहाजांवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये झालेल्या वाढीचाच एक भाग आहे. रॉयटर्सने ५ ऑक्टोबर रोजी दिलेल्या वृत्तानुसार, ऑक्टोबरच्या पहिल्याच आठवड्यात कुवेतचे एमटी काझिमा ३ आणि लायबेरियाचे 'लिप्सी' या जहाजांसह किमान सात टँकरवर हल्ले झाले आहेत. या जलमार्गावरून होणारी कच्च्या तेलाची वाहतूक युद्धपूर्व पातळीच्या जवळ पोहोचली असतानाही हे हल्ले सुरूच आहेत.

या संघर्षात भारतीय खलाशीही बळी पडत आहेत. रॉयटर्सच्या माहितीनुसार, जुलै महिन्यात इराणच्या क्रूझ क्षेपणास्त्रांनी ओमानच्या सागरी हद्दीतून जाणाऱ्या 'एमटी मोम्बासा' आणि 'एमटी अल बहिया' या संयुक्त अरब अमिरातीशी संबंधित दोन टँकर्सना लक्ष्य केलं होतं. या हल्ल्यात एक भारतीय कर्मचारी ठार झाला होता, तर १० जण जखमी झाले होते.

इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्षामुळे जहाजांवर होणारे हल्ले तीव्र झाले आहेत. रॉयटर्सने ९ सप्टेंबरच्या घटनांचं वर्णन युद्ध सुरू झाल्यापासून दोन्ही बाजूंनी केलेले आतापर्यंतचे सर्वात मोठे हल्ले असं केलं आहे. ९ सप्टेंबर रोजी अमेरिकेने इराणचे पाच तेल टँकर्स बुडवल्यानंतर, इराणने सामुद्रधुनीजवळ १० जहाजांवर हल्ला केल्याचा दावा केला होता, ज्यामध्ये किमान एक खलाशी ठार आणि एक जण बेपत्ता झाला होता.

### १९ कर्मचाऱ्यांपैकी १७ जण भारतीय

जखमी कर्मचाऱ्यांना ओमानच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सुरक्षित बाहेर काढण्यात आलं असून, ओमानमधील खसाब येथे त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या जहाजावरील एकूण १९ कर्मचाऱ्यांपैकी १७ जण भारतीय नागरिक आहेत. भारताने या हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून मदतीबद्दल ओमान प्रशासनाचे आभार मानले आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगातील एकूण तेल आणि द्रवीभूत नैसर्गिक वायू पुरवठ्यापैकी सुमारे एक पंचमांश (१/५) भागाची वाहतूक होते. या मार्गावरील अडथळ्यांमुळे तेलाच्या किमतींवर परिणाम होत असून, जहाजांचा वाहतूक खर्च वाढत आहे आणि ऊर्जा पुरवठा धोक्यात आला आहे.

# 15 वषार्ंनी पुन्हा एकत्र आली 'मन उधाण वाऱ्याचे'ची टीम



काही मालिका संपल्यानंतरही त्यांच्या आठवणी प्रेक्षकांच्या मनात कायमच्या घर करून राहतात. 'मन उधाण वाऱ्याचे' हीदेखील अशीच एक लोकप्रिय मालिका होती. स्टार प्रवाह वाहिनीवर प्रसारित झालेल्या या मालिकेने आपल्या कथानकाने आणि व्यक्तिरेखांनी प्रेक्षकांची विशेष पसंती मिळवली होती. २००९ मध्ये सुरू झालेली ही मालिका २०११ मध्ये प्रेक्षकांचा निरोप घेतला. मात्र, मालिकेच्या आठवणी आजही ताज्या आहेत.

आता तब्बल १५ वर्षांनंतर 'मन उधाण वाऱ्याचे' मालिकेतील काही कलाकार पुन्हा एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. यानिमित्ताने अभिनेत्री नेहा गद्रे हिने सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर करत जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. "मन उधाण वाऱ्याचे... १५ वर्षांनंतर पुन्हा एकदा त्या आठवणींच्या वाऱ्यावर!" असं म्हणत नेहाने या मालिकेच्या आठवणींना उजाळा दिला. 'मन उधाण वाऱ्याचे' ही केवळ एक टीव्ही मालिका नव्हती, तर ती आपल्या आयुष्याचा आणि आठवणींचा एक सुंदर भाग बनली होती, अशी भावना तिने व्यक्त केली. गेल्या १५ वर्षांत माणसं, ठिकाणं, आयुष्य आणि परिस्थिती बरंच काही बदललं. मात्र, काही आठवणी काळाच्या ओघातही तशाच अबाधित राहतात. त्या सुंदर प्रवासाचा भाग असलेल्या कलाकार आणि सहकाऱ्यांना पुन्हा भेटणं खरोखरच खास होतं, असंही नेहाने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.



## जान्हवी किल्लेकरचा थरारक अंदाज.!

टेलिव्हिजन मालिका, मराठी सिनेमे आणि 'बिग बॉस'सारख्या रिॲलिटी शोमधून प्रेक्षकांच्या मनात वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री 'जान्हवी किल्लेकर' आता एका भन्नाट आणि रहस्यमय भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. जान्हवी आगामी 'मिरांडा वॉर्निंग' या सस्पेन्स-थ्रिलर सिनेमात महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे. विशेष म्हणजे, या सिनेमाची कथा एका फार्महाऊसवर घडलेल्या खुनाच्या घटनेभोवती फिरते. खून नेमका कोणी केला? या हत्येमागचं कारण काय? आणि सत्याच्या शोधात पुढे कोणकोणती रहस्यं उलगडणार? या प्रश्नांची उत्तरं सिनेमातून मिळणार आहेत. 27 नोव्हेंबर रोजी 'मिरांडा वॉर्निंग' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'मिरांडा वॉर्निंग'ची कथा हेरिटेजवाडी नावाच्या फार्महाऊसवर घडलेल्या एका खुनाच्या घटनेपासून सुरू होते. फार्महाऊसवर खून झाल्यानंतर या घटनेचा तपास सुरू होतो आणि त्यातून अनेक धक्कादायक गोष्टी समोर येऊ लागतात. सत्याचा शोध घेताना तपास यंत्रणेसमोर कोणती आव्हानं उभी राहतात, या प्रकरणामागे नेमकं कोणाचं रहस्य दडलं आहे आणि शेवटपर्यंत प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारं सत्य काय आहे, याची उत्सुकता सिनेमामुळे निर्माण झाली आहे. या सिनेमात आदिनाथ कोठारे एका रफटफ आणि दमदार पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. त्यामुळे एका बाजूला खुनाचं गूढ आणि दुसऱ्या बाजूला त्याचा तपास करणारा पोलीस अधिकारी, अशी थरारक पार्श्वभूमी सिनेमात पाहायला मिळणार आहे. जान्हवी किल्लेकरने आजवर विविध भूमिका साकारून स्वतःच्या अभिनयाची वेगळी छाप निर्माण केली आहे. 'भाग्य दिले तू मला' या टीव्ही मालिकेतील तिच्या अभिनयाला प्रेक्षकांची पसंती मिळाली. त्यानंतर 'सायको रंगा' सारख्या सिनेमातूनही तिने अभिनयाची वेगळी बाजू दाखवली. 'बिग बॉस' या रिॲलिटी शोमधील सहभागामुळे तिची लोकप्रियता आणखी वाढली. या चित्रपटातील जान्हवी किल्लेकरची भूमिका नेमकी कशी असेल, याबाबत सध्या गुप्तता ठेवण्यात आली आहे. तिच्या भूमिकेमुळे कथेला एक नवा ट्विस्ट मिळण्याची शक्यता असून, प्रेक्षकांची उत्सुकता अधिकच वाढली आहे. सस्पेन्स, थरार आणि रहस्याची सांगड घालणारा हा सिनेमा जान्हवीच्या चाहत्यांसाठीही खास पर्वणी ठरणार आहे.



## सोनाली बेंद्रेचे मराठी सिनेमात पदार्पण

बॉलिवूड अभिनेत्री सोनाली बेंद्रे एक नवा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस घेऊन येत आहे. 'सोहळा' असे या चित्रपटाचे नाव असून नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. सोनाली बेंद्रे या चित्रपटाच्या माध्यमातून पहिल्यांदाच मराठी चित्रपट प्रेझेंटर म्हणून काम करत आहे. त्यामुळे या चित्रपटाबद्दल सिनेरसिकांमध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. नाती, भावनिक बंध आणि बालपणीच्या निरागस आठवणींचा मेळ या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. सिनेमाच्या ट्रेलरमध्ये एका गावात राहणाऱ्या लहान मुलाची आणि त्याच्या कुटुंबाची एक संवेदनशील आणि भावनिक गोष्ट पाहायला मिळते. अचानक उद्भवलेल्या एका संकटामुळे आणि परिस्थितीमुळं त्याच्या आयुष्याला मिळणारं वळण आणि त्यातून होणारा त्याचा कौटुंबिक प्रवास ट्रेलरमध्ये अतिशय भावनिक पद्धतीनं रेखाटण्यात आला आहे. 'सोहळा' सिनेमाचे दिग्दर्शन साईकत बागबान यांनी केले असून, निर्मिती गोल्डी बहलसह सचिन श्रीवास्तव, रत्ना श्रीवास्तव व कविता बागबान यांनी केली आहे; तर सिनेमाची प्रेझेंटर अर्था प्रस्तुतकर्ती म्हणून सोनाली बेंद्रे काम करणार आहे. 'सोहळा' हा चित्रपट १६ ऑक्टोबर २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटात एका १३ वर्षांच्या बालकलाकारासह काही दिग्गज मराठी कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. मी सोहळामध्ये अभिनेत्री म्हणून प्रस्तुतकर्ती नाही, तर या चित्रपटावर आणि कथेवर विश्वास असलेली व्यक्ती म्हणून त्याला प्रेक्षकांसमोर घेऊन येत असल्याची प्रतिक्रिया देखील सोनालीने दिली.

# हरमनप्रीत कौरनं कर्णधारपद सोडलं!

## तिन्ही फॉरमॅटमधून तात्काळ पायउतार, खेळाडू म्हणून मैदानावर कायम राहणार

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**भारताला महिला विश्वचषक जिंकून देणारी एकमेव कर्णधार हरमनप्रीत कौरने मंगळवारी तात्काळ प्रभावाने कर्णधारपद सोडण्याचा निर्णय जाहीर केला. हरमनप्रीतने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक सविस्तर पोस्ट करत ही घोषणा केली. बीसीसीआय सह झालेल्या रिव्ह्यू मीटिंगनंतर हरमनप्रीत कौरने हा मोठा निर्णय जाहीर केला.**

भारताच्या सर्वकालीन महान क्रिकेटपटूंमध्ये गणली जाणारी हरमनप्रीत कौर २०२२ मध्ये मिताली राजच्या निवृत्तीनंतर भारतीय संघाची पूर्णवेळ कर्णधार बनली. त्याआधीही ती संघाची उपकर्णधार म्हणून वेळोवेळी संघाचं नेतृत्व करत होती. कर्णधार म्हणून तिचा शेवटचा सामना मागील महिन्यातील आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळला गेला. तिच्या नेतृत्वाखाली भारताने सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकलं. दरम्यान, हरमनप्रीतने स्पष्ट केलं आहे की, ती यापुढेही तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतासाठी खेळण्यासाठी उपलब्ध राहणार आहे.

हरमनप्रीत कौरने आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये लिहिलं की, आज मी सर्व फॉरमॅटमधील भारतीय महिला क्रिकेट संघाचं कर्णधारपद सोडत आहे. हा निर्णय घेणं माझ्यासाठी अजिबात सोपं नव्हतं. या निर्णयाबरोबर अनेक वर्षांच्या आठवणी, भावना, त्याग आणि आयुष्यभर मनात कोरल्या गेलेल्या असंख्य क्षणांचा समावेश आहे.

मी या संघासाठी आणि भारतीय महिला क्रिकेटसाठी माझ्याकडचं सर्वस्व दिलं आहे. माझं रक्त, घाम, वेळ आणि अनेकदा माझ्या स्वतःच्या खेळाचा




तसेच वैयक्तिक महत्त्वाकांक्षांचाही त्याग केला आहे. काही प्रसंगी मला माझी वैयक्तिक कामगिरी, स्वतःची प्रगती आणि माझ्या मनात असलेल्या इच्छा बाजूला ठेवाव्या लागल्या, कारण माझ्यासाठी संघ नेहमीच सर्वांत आधी होता.

कर्णधार म्हणून मला अनेक कठीण निर्णय घ्यावे लागले. हे निर्णय नेहमीच सर्वांना समजले नाहीत, ते घेणंही सोपं नव्हतं आणि काही निर्णयांची वैयक्तिक किंमतही मला मोजावी लागली. पण माझ्या प्रत्येक निर्णयामागे एकच उद्देश होता, या संघाला अधिक चांगलं बनवणं आणि इतर खेळाडूंना स्वतःचा खेळ उंचावण्याची, स्वतःवर विश्वास ठेवण्याची आणि स्वतःमधील सर्वोत्तम खेळाडू घडवण्याची संधी देणं. मी सगळं पाहिलं आहे. संघाचे सर्वांत कठीण क्षण, हृदय पिळवटून टाकणारे पराभव, टीका, शंका आणि काहीही आपल्या बाजूने घडत नसल्यासारखे वाटणारे दिवसही मी अनुभवले आहेत. त्याचबरोबर सर्वोच्च आनंदाचे क्षणही अनुभवले, विजय, जल्लोष, देशाचं प्रतिनिधित्व करण्याचा अभिमान आणि प्रत्येक त्याग सार्थ ठरवणारे क्षणही पाहिले.

आज मी कर्णधारपद सोडत आहे. मनात असंख्य भावना आहेत, पण त्याचवेळी मनात एक प्रकारची शांतताही आहे. कारण माझा माझ्या संघावर मनापासून विश्वास आहे. हा संघ प्रतिभावान आहे, त्याच्यात जिद्द आहे, आत्मविश्वास आहे आणि त्याचं भविष्य उज्ज्वल आहे. या संघाचा पुढचा प्रवास पाहण्यासाठी आणि त्याचा एक भाग राहण्यासाठी मी खूप उत्सुक आहे.

मला वाटतं, मी माझी जबाबदारी पूर्णपणे पार पाडली आहे. मी या संघाला माझ्याकडचं सर्वस्व दिलं. ही जबाबदारी अभिमानाने सांभाळली आणि भारतीय महिला क्रिकेटचं नेतृत्व करण्याची संधी मिळाली, यासाठी मी कायमच कृतज्ञ राहीन. आता माझ्यासाठी आयुष्याचं एक नवं पान उलटण्याची वेळ आली आहे.

आज कर्णधारपदाची भूमिका संपत आहे, पण भारतीय क्रिकेटवरील माझं प्रेम कधीच संपणार नाही. माझ्या प्रत्येक सहकाऱ्याचे, प्रशिक्षकांचे, सपोर्ट स्टाफचे, व्यवस्थापनाचे, बीसीसीआयचे, कुटुंबीयांचे आणि चांगल्या-वाईट प्रत्येक काळात माझ्या पाठीशी उभ्या राहिलेल्या प्रत्येक चाहत्याचे मनापासून आभार. रक्त. घाम. त्याग. अभिमान. – मी माझ्याकडचं सर्व काही दिलं. आता पुन्हा एकदा केवळ या खेळावरील प्रेमासाठी मैदानात उतरण्यासाठी मी सज्ज आहे. कर्णधाराची भूमिका संपली, पण प्रवास सुरूच आहे.

# विराटला प्रेमानंद महाराज भेटीसाठी ५ कोटी? दिनेश फलहारींचा दावा

**महाईन्यूज | वृंदावन**

**विराट कोहली आणि वृंदावन यांच्यात गेल्या काही वर्षांत आध्यात्मिक नातं अधिक दृढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. विराट कोहली त्याची पत्नी अनुष्का शर्मासह अनेकदा वृंदावनला गेल्याचे फोटो व्हिडिओ सोशल मीडियावर आपण पाहिले आहेत. आपल्या मुलांसह तर हे काही वेळेस दोघेच वृंदावनमध्ये प्रेमानंद महाराजांच्या भेटीला गेले आहेत. पण विराट कोहलीसंबंधित एका दाव्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. श्रीकृष्ण जन्मभूमी संघर्ष न्यासाचे अध्यक्ष दिनेश फलहारी यांनी हा आरोप केला आहे.**



क्रिकेटपटू विराट कोहलीशी संबंधित एका दाव्यामुळे वृंदावनमध्ये नवा वाद सुरू झाला आहे. श्रीकृष्ण जन्मभूमी संघर्ष न्यासाचे अध्यक्ष दिनेश फलहारी यांनी आरोप केला आहे की, एका प्रॉपर्टी सिंडिकेटने कोहलीची प्रेमानंद महाराजांशी भेट घडवून आणण्यासाठी तब्बल ५ कोटी रुपये खर्च केले.

फलहारी यांच्या दाव्यानुसार, एका संतांशी विराट कोहलीची भेट घडवून आणण्यासाठी ५ कोटी रक्कम खर्च करण्यात आली. संबंधित संत हे प्रेमानंद महाराज असल्याची चर्चा आहे. फलहारी यांनी असा आरोप केला आहे की, प्रॉपर्टीशी संबंधित हितसंबंध असलेले काही लोक निवडक आध्यात्मिक व्यक्तींचा प्रभाव आणि प्रसिद्धी वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच, यामुळे यमुना खादर परिसरातील प्रस्थापित संतांच्या स्थानावरही परिणाम होत असल्याचा त्यांचा दावा आहे.

दिनेश फलहारी या व्हिडिओमध्ये म्हणाले, "आम्ही महाराजांना विनंती केली आहे की, इथे वृंदावनमध्ये संतांचे दोन गट पडले आहेत. एक आहेत खरे संत एक आहेत खोटे संत. काही प्रॉपर्टीचे व्यापारी त्यात घुसले आहेत, जे यमुना खादर परिसरातील जागा विकत आहेत. जे खरे चांगले संत आहेत, ते महाराजांकडे गेले. आम्ही महाराजजींना हीच विनंती केली आहे की तुम्ही वृंदावन सोडा आणि गोवर्धन गिरीराजजी इथे या, आम्ही बृजवासी तुमची सेवा करू. तुम्ही वृंदावनपासून दूर व्हा. कारण इथे प्रॉपर्टीवरून खूप मोठी प्रकरणं सुरू आहेत. मोठमोठे माफिया इथे सक्रिय झाले आहेत आणि तुम्हाला बदनाम करत आहेत. ज्या लोकांनी ५ कोटी रूपये देऊन विराट कोहलीला इथे आणलं होतं, तेच लोक यमुना खादर परिसरातील जागांचे व्यवहार करत आहेत. त्यांनी प्रॉपर्टीचं इतकं मोठं साम्राज्य इथे प्रस्थापित केलं आहे की मोठे अधिकारीही त्यांच्यासमोर नतमस्तक झाले आहेत.

"आमचं प्रेमानंद महाराजांना एवढंचं सांगणं आहे की ते एक चांगले संत आहेत. आधीही ते चांगलेच संत होते, आजही आहेत. तर प्रॉपर्टीचा हा जो खेळ सुरू आहे, राजस्थानचे जे डीलर यात सामील आहेत त्यांनी महाराजाजींचं नाव खराब केलं आहे. विराट कोहलीच्या नावाचा वापर करून यापूर्वी त्यांनी महाराजांना सहकार्य केलं होतं. त्यावेळी महाराजांची फारशी ओळख नव्हती. त्यांनी विराट कोहलीची महाराजांशी भेट घडवून आणली आणि त्यातून महाराजांचं नाव संपूर्ण जगभर पोहोचलं, त्यांचा 'टीआरपी' वाढला," असं ते पुढे म्हणाले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। बुधवार ।
दि. 07 ऑक्टोबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# मिशन वॉन्टेडमध्ये 'अँटी गुंडा स्कॉड' अव्वल, १३२ गुणांसह पहिला क्रमांक!

## युनिट तीन दुसरे, युनिट एक व दोन तिसऱ्या क्रमांकावर; २४७ आरोपींची धरपकड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वॉन्टेड आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी राबविलेल्या १५ दिवसांच्या 'मिशन वॉन्टेड'मुळे गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. पोलीस ठाणी आणि गुन्हे शाखेने केलेल्या धडक कारवाईत २४७ आरोपींना पकडण्यात यश मिळाले आहे. गुन्हे शाखेच्या अंतर्गत स्पर्धेत अँटी गुंडा स्कॉडने १३२ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. युनिट तीनने १०३ गुणांसह दुसरा, तर युनिट एक आणि युनिट दोनने प्रत्येकी ८४ गुण मिळवत संयुक्त तिसरे स्थान मिळविले.**



> गंभीर गुन्हे करून फरार झालेल्या तसेच दीर्घकाळापासून पाहिजे असलेल्या आरोपींना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात आली. पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेने चांगली कामगिरी केली आहे. अद्याप फरार असलेल्या आरोपींचा शोधही त्याच तीव्रतेने सुरू राहणार आहे. गुन्हा करून फरार राहिल्यास पोलीस आपल्यापर्यंत पोहोचणार, हा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.
>
> **- विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.**

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध गुन्ह्यांत वॉन्टेड असलेल्या आरोपींची संख्या मोठी असल्याने २७ जुलै ते १२ ऑगस्टदरम्यान विशेष मोहीम हाती घेण्यात आली. मोहिमेपूर्वी २ हजार ६३५ पाहिजे आणि ३२ फरारी असे एकूण २ हजार ६६७ आरोपी पोलिसांच्या रडारवर होते. त्यानंतर पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशानुसार पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेची स्वतंत्र पथके कामाला लावण्यात आली. आरोपींचे जुने पत्ते, नातेवाईक आणि संपर्कातील व्यक्ती यांचा माग काढण्याबरोबरच उपलब्ध माहितीच्या आधारे शोधमोहीम तीव्र करण्यात आली.

या कारवाईत पोलीस ठाण्यांनी १४०, तर गुन्हे शाखेने १०७ आरोपी पकडले. याशिवाय मृत्यू, प्रकरण, अटकपूर्व कारवाई किंवा दुबार नावे अशा कारणांमुळे ७९ प्रकरणे कमी झाली आहेत. त्यामुळे एकूण ३२६ प्रकरणांचा निपटारा होऊन आता २ हजार ३४१ आरोपींचा शोध बाकी असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे.

गुन्हे शाखेच्या कामगिरीत अँटी गुंडा स्कॉडने मोक्कातील सहा, गंभीर गुन्ह्यांतील नऊ आणि इतर गुन्ह्यांतील सहा अशा २१ आरोपींना पकडत १३२ गुणांची मजल मारली. विशेष म्हणजे, संख्येच्या बाबतीत युनिट तीनने सर्वाधिक २४ आरोपी पकडले; मात्र गुन्ह्यांचे स्वरूप आणि त्यासाठी निश्चित केलेल्या गुणांकनामुळे अँटी गुंडा स्कॉडने बाजी मारली. युनिट तीनच्या कारवाईत मोक्कातील एक, गंभीर गुन्ह्यांतील आठ आणि इतर गुन्ह्यांतील १५ आरोपींचा समावेश आहे.

विशेष मोहिमेमुळे अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपींच्या हालचालींवर मर्यादा आल्या असून, फरारांच्या गोटात धडकी भरल्याचे चित्र आहे. जुन्या गुन्ह्यांच्या फायली पुन्हा उघडून आरोपींचा माग काढण्यात आल्याने काही आरोपींना आपली सुरक्षित ठिकाणे बदलावी लागल्याची चर्चा आहे. दरम्यान, अद्याप मोठ्या संख्येने आरोपी पकडायचे असल्याने 'मिशन वॉन्टेड'ची धार कायम ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोलीस ठाण्यांच्या कामगिरीत हिंजवडी पोलीस ठाण्याने १९ आरोपी पकडून ८४ गुणांसह पहिला क्रमांक मिळविला. पिंपरीने १२ आरोपी पकडून ५७ गुणांसह दुसरे, तर सांगवीने १० आरोपी पकडून ५४ गुणांसह तिसरे स्थान मिळविले. त्यापाठोपाठ संत तुकारामनगर आणि वाकड प्रत्येकी ४८, निगडी ४२, चिखली ३७, तळेगाव दाभाडे ३३, चाकण उत्तर ३० आणि आळंदी पोलीस ठाण्याने २७ गुण मिळविले आहेत .

अँटी गुंडा स्कॉडने १३२ गुणांसह पहिला, युनिट तीनने १०३ गुणांसह दुसरा, तर युनिट एक आणि युनिट दोनने प्रत्येकी ८४ गुणांसह संयुक्त तिसरा क्रमांक मिळविला. युनिट चारने ६९, मालमत्ता/दरोडा विरोधी पथकाने २४, अमली पदार्थ विरोधी पथकाने १८ आणि खंडणी विरोधी पथकाने तीन गुण मिळविले.

### पाच राज्यांत 'अँटी गुंडा स्कॉड'ची मोहीम..

'मिशन वॉन्टेड'मध्ये अँटी गुंडा स्कॉडने राज्यांच्या सीमा ओलांडून मोक्कातील आरोपींचा माग काढला आहे. मोहिमेदरम्यान पाच वेगवेगळ्या राज्यांतून मोक्काच्या प्रकरणांतील आरोपींना ताब्यात घेण्यात आले. हरियाणातून सुभाष बिश्नोई, उत्तर प्रदेशातून वैभव नागझरकर, तेलंगणातून अफजल शहा, कर्नाटकातून अंकुश सूर्यवंशी, तर बिहारमधून प्रकाश राम आणि चंदन राम यांना पथकाने हुडकून काढले. याशिवाय तळेगाव येथील स्थानिक आरोपी सौरभ आरगडे यालाही ताब्यात घेण्यात आले. अशा प्रकारे मोक्कातील सात आरोपींना ताब्यात घेत अँटी गुंडा स्कॉडने 'मिशन वॉन्टेड'मध्ये आपली छाप पाडली.

# पिंपरी-चिंचवडच्या कराटेपटूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दमदार कामगिरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मुंबई येथील मिहिर सेन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, ठक्कर मॉलसमोर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मीरा रोड क्रिडा संकुलन महाराष्ट्र येथे रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी 6TH SHOTOKAN CUP INTERNATIONAL LEVEL KARATE TOURNAMENT 2026 या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**



ही स्पर्धा International Shotokan Karate-Do Organization (I.S.K.O.) यांच्या वतीने WUSU International Martial Arts Association यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारत, जपान, भूतान, मलेशिया आणि श्रीलंका या देशांतील कराटेपटूंनी सहभाग घेतला.

या स्पर्धेत पिंपरी-चिंचवड शहरातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत २९ सुवर्ण, १८ रौप्य आणि १५ कांस्यपदके, अशी एकूण ६२ पदके पटकावून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

यामध्ये पिंपरी-चिंचवड येथील कु. गौरांगी गौरव गायकवाड हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदक व कांस्यपदक अशी दोन पदके मिळवली. तिच्या या यशाबद्दल पालक, प्रशिक्षक व कुटुंबीयांकडून तिचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

स्पर्धेत Kata व Kumite या दोन्ही प्रकारांचा समावेश होता. WUSU International Martial Arts Associationच्या प्रशिक्षक निशा गुप्ता मॅडम व आशितोष दौडकर सर यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण तसेच स्पर्धेसाठी आवश्यक प्रात्यक्षिक व परीक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडमधील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली.

लहान वयातच कराटेसारख्या क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद असून, त्यांच्या कामगिरीमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रेरणा मिळत आहे.

मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश अभिमानास्पद आहे. भविष्यात पिंपरी-चिंचवडमधून आणखी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे कराटेपटू घडावेत, अशी अपेक्षा पालक व प्रशिक्षकांनी व्यक्त केली.

# एमआयटीच्या 'सायफारी ५.०'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## 'नॉलेज फ्युजन फेस्ट' अंतर्गत स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी येथे नॉलेज फ्युजन फेस्ट' अंतर्गत 'सायफारी ५.०' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुणे व परिसरातील ४० महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमधील ८७८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.**



वेब डिझायनिंग, कोडिंग, रोबोटिक्स, तांत्रिक आव्हाने, संगणकीय खेळ, खजिना शोध, वेशभूषा सादरीकरण, नृत्य, गायन, चित्रफित निर्मिती, चित्रकला, व्यंगचित्र रचना, टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती तसेच विक्री व विपणन अशा विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य, सर्जनशीलता आणि कलागुण सादर करण्याची संधी मिळाली.

या उपक्रमाचे आयोजन संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी आणि संगणकशास्त्र व अनुप्रयोग शाखेच्या अधिष्ठाता डॉ. रश्मी लाड यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. संगीता बोर्डे यांच्या सहकार्याने डॉ. भालचंद्र पवार आणि डॉ. मयुरी बापट यांनी समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्राध्यापक, विद्यार्थी समन्वयक आणि स्वयंसेवकांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

'सायफारी ५.०'मुळे विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण, कौशल्यप्रदर्शन आणि आंतरमहाविद्यालयीन संवादाचे प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले.



## 'विद्या-सेतू' उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

येथील एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विज्ञान व संगणकशास्त्र विभागाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत 'विद्या-सेतू' या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शैक्षणिक साहित्य संकलन मोहीम राबवून जिल्हा परिषद शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.

या उपक्रमांतर्गत चिंबळी व पाचवड केंदूर येथील जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन तेथील एकूण २५ गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. या गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, लेखन साहित्य तसेच चित्रकलेचे साहित्य भेटस्वरूपात देण्यात आले. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याची मदत व्हावी आणि त्यांच्यातील गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन सहायक प्राध्यापिका सौ. मोनिका उगले आणि सौ. कविता सांडभोर यांनी केले. हा उपक्रम विभागप्रमुख डॉ. संगीता बोर्डे व महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. बी. बी. वाफारे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नवी ऊर्जा मिळाली असून, महाविद्यालय व परिसरातील शाळांमधील शैक्षणिक व सामाजिक स्नेहबंध अधिक दृढ झाले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## 3री राष्ट्रीय थाई किकबॉक्सिंग स्पर्धा: महाराष्ट्राचा डंका! राष्ट्रीय विजेतेपदासह 5 टायटल बेल्टवर कोरले नाव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**इंडिया थाई किकबॉक्सिंग फेडरेशनतर्फे आयोजित 3री राष्ट्रीय थाई किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप व टायटल बेल्ट स्पर्धा गोव्यात मोठ्या उत्साहात पार पडली. पेडेम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, मापुसा येथील बॉक्सिंग हॉलमध्ये २ ते ४ ऑक्टोबर दरम्यान रंगलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर राष्ट्रीय विजेतेपद (जनरल चॅम्पियनशिप) पटकावले, तर कर्नाटक संघ उपविजेता ठरला.**




स्पर्धेचे उद्घाटन गोवा शासनाच्या क्रीडा व युवा व्यवहार विभागाचे उपसंचालक डॉ. विवेक पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी इंडिया थाई किकबॉक्सिंग फेडरेशनचे अध्यक्ष संतोष म्हात्रे आणि अवकारिका फाउंडेशनचे संचालक सी.ए. अरविंद भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यास रोहित पवार, योगेश कवळे, ग्रँडमास्टर समीर पांढरकर, अविनाश पवार, अभिषेक शहा, किरण माने, अमित पाल, तेजल पवार, ओम पांढरकर, सेजल पवार, नितीन शहा, कुणाल जोगदंड, आदित्य अडागळे आणि वैश्णवी भागवत यांसह विविध मान्यवर, प्रशिक्षक व अधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेचे सामने सुरळीत पार पाडण्यासाठी अभिषेक शहा यांनी रिंग इन्चार्ज, अविनाश पवार यांनी टेक्निकल डायरेक्टर आणि समीर पांढरकर यांनी चॅम्पियनशिप सेक्रेटरी म्हणून जबाबदारी सांभाळली. किरण माने, अमित पाल, आदित्य अडागळे, तेजल पवार आणि ओम पांढरकर या पंचांनी निष्पक्षपणे काम पाहिले.

### राष्ट्रीय टायटल बेल्ट विजेते

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अमॅच्युअर गटासोबतच प्रतिष्ठेच्या टायटल बेल्ट विभागात वर्चस्व गाजवत ८ पैकी ५ गटांत विजेतेपद मिळवले:

विभागवजन गटविजेता / विजेतीराज्य
महिला–५५ किलो-सायली घोडके, महाराष्ट्र
महिला–६५ किलो-वैश्णवी भागवत, महाराष्ट्र
महिला+६५ किलो-शरयू संतोष म्हात्रे, महाराष्ट्र
पुरुष–४५ किलो, आनंद लांडगे, महाराष्ट्र
पुरुष–५५ किलो, प्रतीक लांबडे, महाराष्ट्र
पुरुष–६५ किलो, वैशांक प्रदीप, कर्नाटक
पुरुष–७५ किलो, केशव गौतम, कर्नाटक
पुरुष+७५ किलो, कुणाल जोगदंड, महाराष्ट्र

# Dr. D. Y. Patil Technical Campus Student Selected for SPPU Zonal Badminton Team

**MahaEnews | PIMPRI-CHINCHWAD**

**Dr. D. Y. Patil Technical Campus, Varale–Talegaon, Pune, proudly congratulates Ms. Anvi Raut, a student of the Department of Computer Science, on her outstanding selection for the prestigious Savitribai Phule Pune University (SPPU) Zonal Badminton Team.**




Anvi earned this remarkable opportunity through her impressive performance at the SPPU Inter-Collegiate Badminton Tournament 2026. Her dedication, discipline, consistent performance and passion for the sport have contributed to this significant achievement.

Her selection to the SPPU Zonal Team is a proud moment for the institution and highlights the importance of nurturing sporting talent alongside academic excellence. Anvi's accomplishment serves as an inspiration to fellow students to pursue their interests with determination and commitment.

Dr. D. Y. Patil Technical Campus extends its heartfelt congratulations to Anvi Raut and wishes her success in the upcoming Zonal matches. The institute looks forward to seeing her continue to excel and bring further laurels to the institution.

## Priyadarshani School, Moshi Organised "Fun with Math" Knowledge Session

**MahaEnews | PIMPRI-CHINCHWAD**



Priyadarshani School, Moshi organised an engaging and interactive knowledge session on "Fun with Maths" for students of Grades 5,6 and 7.The session purpose was to update students on interesting subject of maths with new insights.

The session was conducted by Mr. Ashish Verma, who brought an innovative and enjoyable approach to learning Mathematics. Through interesting activities, logical puzzles, interactive questions and thought-provoking examples, Mr. Verma encouraged students to look at Mathematics beyond textbooks and routine calculations.

The session focused on developing logical thinking, problem-solving abilities, mental calculation skills and a positive attitude towards Mathematics among students. Students actively participated in the session and enthusiastically responded to the questions and activities presented by the resource person.

The interactive methodology made the session both informative and entertaining, helping students understand that Mathematics can be interesting, creative and fun.The school appreciated efforts put by Mr. Ashish Verma for providing students with such a valuable learning experience. The session concluded with words of appreciation for the resource person and encouragement to students to continue exploring Mathematics with curiosity and confidence.

## Dr. D. Y. Patil Technical Campus Students Secure First Place at 'Urja' 2026

**MahaEnews | PIMPRI-CHINCHWAD**

**Students of Dr. D. Y. Patil Technical Campus, Varale–Talegaon, Pune, brought pride to the institution by securing First Place in the prestigious 'Urja' Model-Making Competition, held as part of the 21st AISSMS Engineering Today 2026.**



The winning team comprising SE students Sumit Varnekar, Tanishka Wani, Pragati Mane, Rishabh Tombare and Aniruddha Tombare showcased an innovative Hybrid Renewable Energy Model integrating Solar and Wind Energy. The project demonstrated the students' understanding of sustainable energy solutions and their ability to transform innovative ideas into practical models.

The team's impressive presentation and innovative approach earned them First Place in the competition, along with a cash prize of ₹5,000 and certificates.

The achievement reflects the students' creativity, technical knowledge, teamwork and commitment to sustainable innovation. Their success is a proud moment for Dr. D. Y. Patil Technical Campus and serves as an inspiration for fellow students to explore innovative solutions for a sustainable future.

The institute congratulates the winning team on this remarkable accomplishment and wishes them continued success in their future academic and technical pursuits.